|| सा विद्या या विमुक्तये ||

# भारतीय ज्ञान प्रणाली

परंपरा | तत्वज्ञान | विज्ञान | मूल्ये | शाश्वत विकास




लेखक

**प्रा. समीर रामचंद्र वैरागी**

# भारतीय ज्ञान प्रणाली

लेखक
प्रा.समीर रामचंद्र वैरागी

**भारतीय ज्ञान प्रणाली**

**लेखक: प्रा.समीर रामचंद्र वैरागी**
**पत्ता : तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि. पुणे - ४१०५०६**
**मोबाईल क्रमांक : ९९८७४६६४६७**
**ईमेल: sameer. vairagi@gmail.com**
**प्रकाशन दिनांक : 28/08/2026 (रक्षाबंधन)**
**ISBN क्रमांक : 978-93-344-8298-0**

# अर्पणपत्रिका

सर्वसमावेशक असलेल्या भारतीय ज्ञान परंपरेस सादर समर्पित

"सा विद्या या विमुक्तये"
(जी मुक्ती देते, बंधनातून सोडवते तीच 'विद्या'.)

# लेखक परिचय



**प्रा. समीर रामचंद्र वैरागी,**
**सहायक प्राध्यापक आणि विभागप्रमुख(मराठी),**
**राजपत्रित अधिकारी(म.शि.से.), गट -अ,**
**महाराष्ट्र शासनाचे इस्माईल युसूफ महाविद्यालय,**
**जोगेश्वरी(पूर्व), मुंबई - ४०००६०.**

शिक्षण : एम.ए., बी.एड., एम.फिल., नेट(जेआरएफ), सेट, वृत्तपत्रपदविका, भगवद्गीता पदविका, मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम, भारतीय ज्ञान परंपरा प्रमाणपत्र अभ्यासक्रम.

# अनुक्रमणिका


भारतीय ज्ञान परंपरा
अनादि, अनंत आणि अमूल्य वारसा
॥ सा विद्या या विमुक्तये ॥
जी विद्या मुक्त करते, तीच खरी विद्या होय.
ऋग्वेद
यजुर्वेद
सामवेद
अथर्ववेद
वेद आणि उपनिषदे
प्रकृती, ब्रह्मांड आणि जीवनांचे गूढ ज्ञान देणारे आद्य ग्रंथ.
योग आणि ध्यान
शरीर, मन आणि आत्म्याचा समतोल साधणारी वैज्ञानिक पद्धत.
विज्ञान आणि गणित
शून्य, दशमान पद्धती, आर्यभट्ट, भास्कराचार्यांचे अद्वितीय योगदान.
आयुर्वेद आणि आरोग्य
स्वस्थ जीवन आणि दीर्घायुष्यासाठी निसर्गाधारित विज्ञान आणि समग्र दृष्टिकोन.
कला, साहित्य आणि संस्कृती
साहित्य, संगीत, नृत्य, वास्तुशास्त्र आणि शिल्पकला यांतून प्रकटलेली समृद्ध भारतीय संस्कृती.
आपली मूल्ये
सत्य
धर्म
शांती
प्रेम आणि करुणा
सेवा
समन्वय
वसुधैव कुटुंबकम्
ॐ
महान विचार
॥ अहिंसा परमो धर्मः ॥
॥ वसुधैव कुटुंबकम् ॥
॥ एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति ॥
– ऋग्वेद
भारतीयांची वैश्विक देणगी
शून्य आणि दशमान पद्धती
आयुर्वेद आणि योग
धातुकर्म आणि वास्तुकला
जलव्यवस्थापन आणि शाश्वत जीवनशैली
न्याय, तर्कशास्त्र आणि व्याकरण
खगोलशास्त्र आणि कालगणना
साहित्य, नाट्य, संगीत आणि नृत्य
आजच्या काळात प्रेरणा
भारतीय ज्ञान परंपरा आपल्याला समतोल, शाश्वत आणि मूल्याधिष्ठित जीवन जगण्याची प्रेरणा देते.
आपला अभिमान, आपली ओळख, आपले भविष्य !
भारतीय ज्ञान परंपरा जपूया, समजून घेऊया आणि पुढे नेऊया.
ज्ञानातून प्रबोधन,
प्रबोधनातून आत्मोन्नती,
आणि आत्मोन्नतीतून
विश्वकल्याण.


वेद
उपनिषद
दर्शन
ज्ञानमीमांसा
तर्कशास्त्र
संशोधन

# भारतीय ज्ञान प्रणाली : एक अवलोकन

भारतीय ज्ञान प्रणाली (IKS) म्हणजे प्राचीन काळापासून भारतात विकसित झालेली विविध प्रकारची तत्त्वज्ञान, विज्ञान, कला, साहित्य, धर्म, योग, औषधशास्त्र (आयुर्वेद), गणित, वास्तुशास्त्र, शिक्षण प्रणाली आणि जीवनशैली यांची एक अत्यंत समृद्ध आणि सुसंगत परंपरा आहे. ही केवळ धार्मिक किंवा आध्यात्मिक नाही, तर ती वैज्ञानिक आणि तर्कशुद्ध विचारांवर आधारित आहे.भारतीय ज्ञान परंपरा वेदांपासून सुरू होते.भारत हा शब्द भा+रत असा बनलेला आहे, भा म्हणजे तेज होय. भारत म्हणजे तेजामध्ये रत असलेले लोक किंवा तेजस्वी लोकांचा देश होय.भारतीय संस्कृती ही सनातन, नित्यनूतन, प्राचीन अशी संस्कृती आहे.भारतीय ज्ञानप्रणाली ही Theory of Everything प्रमाणे समग्र दृष्टिकोण स्वीकारणारी आहे.वेदान्त दर्शनात विश्वाच्या मुळाशी एक शक्ती कार्यरत असते, हा विचार दिसतो.चैतन्यापासून विश्वनिर्मिती झाली, असे वेदान्त तत्त्वज्ञान मानते.कणाद ऋषी यांनी जगत सर्वप्रथम अणूची संकल्पना मांडली.ऋषी हे शास्त्रज्ञ आहेत.भारतीय ज्ञान प्रणालीत विषय ध्यानातून ज्ञान प्राप्त होते व अंतःस्फूर्तीतून ज्ञान निर्माण होते, असे भारतीय परंपरेत मानले जाते.आधुनिक विज्ञान बाहेरील जगाचा शोध घेते, तर भारतीय ज्ञान परंपरा आंतरिक जगाचा शोध घेते. भारतीय ज्ञान प्रणाली मौखिकतेतून पुढे आली आहे. संस्कृत, प्राकृत या भारतीय भाषांमध्ये शब्द निर्माण करण्याची शक्ती आहे.

## वैदिक ज्ञानप्रणाली

भारतीय ज्ञान प्रणाली म्हणजे वेद, उपनिषदे, आयुर्वेद, गणित, ज्योतिष, स्थापत्यशास्त्र, कला आणि तंत्रज्ञान यांसारख्या पारंपरिक आणि

आधुनिक ज्ञानाचा एकत्रित विचार होय. ही प्रणाली समग्र असून, यात तात्त्विक, सांस्कृतिक आणि वैज्ञानिक विचारांची सांगड घातलेली आहे. ज्ञान एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे पद्धतशीरपणे हस्तांतरित करण्यासाठी ही एक संघटित प्रणाली आहे, जी शिक्षण आणि जीवनाच्या विविध पैलूंना स्पर्श करते. भारतीय ज्ञान परंपरा प्रश्नांपासून सुरू होते.भारतीय ज्ञान प्रणालीचा 'उपनिषदे' हा सर्वोत्तम आविष्कार होय.उपनिषदे हा भारतीय ज्ञानप्रणालीचा गाभा मानला जातो.सर्व ज्ञानांचा उगम उपनिषदांत आढळतो. उपनिषद हा शब्द उप्+नि+सद् या मूळ धातूंपासून बनलेला आहे, याचा अर्थ 'च्या जवळ जाणे', गुरूच्या जवळ बसून मिळवलेले ज्ञान, ज्ञानाच्या जवळ जाणे असा होतो.उपनिषदे शेकडो आहेत, परंतु त्यातील ईशा(यजुर्वेद), केन(सामवेद), कठ(यजुर्वेद), प्रश्न (अथर्ववेद), मुंडक(अथर्ववेद), मांडूक्य(अथर्ववेद), तैत्तिरीय(यजुर्वेद), तैत्तिरीय(यजुर्वेद), ऐतरेय (ऋग्वेद), छांदोग्य, बृहदारण्यक ही दशोपनिषदे महत्त्वाची आहेत.उपनिषदे ही संस्कृत भाषेत आहेत.भारतीय ज्ञानप्रणालीत विश्व म्हणजे काय?, विश्वाची निर्मिती कशी झाली आहे?, विश्व चालते कसे?, जगातील क्रियाकलाप या प्रश्नांतून ज्ञाननिर्मिती झाली आहे. बृहदारण्यक उपनिषदात वाद पद्धतीद्वारे ज्ञानाची चर्चा केलेली आढळते. या उपनिषदात याज्ञवल्क्य ऋषी आणि गार्गी यांच्याद्वारे ज्ञानाची चर्चा मांडली आहे. **"एकेन ज्ञानेन सर्वं ज्ञानामि भवेत!"** म्हणजेच " मी काय जाणल्याने सर्व जाणल्यासारखे होईल." असा प्रश्न शौनकाने अंगिरस ऋषींना विचारला आहे. **'वादे वादे जायते तत्त्वबोधः !'** या सूत्राला खूप महत्त्व आहे.

भारतीय ज्ञान प्रक्रिया प्रश्नांपासून सुरू होते. "अथातो ...!" या शिष्याच्या प्रश्नातून भारतीय ज्ञानपरंपरा सुरू होते.भारतीय ज्ञान परंपरेचे 'सूत्रशैली' हे व्यवच्छेदक लक्षण आहे.भारतीय ज्ञानप्रणालीचा इतिहास सूक्त कालखंडात मांडता येतो.वेदांपासून सूत्र कालखंड सुरू होतो. वैदिक जीवनपद्धती यज्ञावर आधारित होती.

वेद हे भारतीय ज्ञान प्रणालीचे मूळ आधारस्तंभ आहेत. वेद या शब्दाचा अर्थ आहे 'ज्ञान' होय.वेद हा शब्द 'विद्' या धातुपासून निर्माण झाला आहे. विद् म्हणजे जाणणे होय. वेद म्हणजे जे जाणलेले आहे असे ज्ञान. ते जगातील सर्वात प्राचीन धार्मिक आणि साहित्यिक ग्रंथ मानले जातात.भारतीय संस्कृतीत वेद 'श्रुती' व 'अपौरुषेय' मानले जाते.वेद कोणी एका व्यक्तीने निर्माण केले नसून ते अनादी-अनंत मानले जातात.वेदाची मूळ संहिता 'ऋग्वेद' होय. व्यासांनी वेदाचे चार भाग केले. व्यासांनी वेद सुसंघटित केले. वेदात Cosmology प्रमाणे विश्व निर्मितीबद्दल सांगितले आहे. वेदात ज्ञान, विज्ञान, भूमिती, ध्वनीशास्त्र(Phonetic), विश्वाचे रहस्य मांडले आहे. वैदिक वाङ्मयाचे वेद(संहिता) → ब्राह्मणे → आरण्यके → उपनिषदे(वेदान्त) असे टप्पे पडतात.

## वेदांचे स्वरूप

**अपौरुषेय** : वेद मानवाने रचलेले नाहीत, तर ते 'ऋषींना' गहन ध्यानात असताना 'ऐकू आले' (श्रुती – ऐकणे) म्हणून त्यांना 'श्रुती' असेही म्हणतात.

**नित्यत्व** : वेद हे शाश्वत आणि अनादी मानले जातात.

**संकलन** : मूळतः वेद एकच होते, परंतु महर्षी वेद व्यास यांनी त्यांचे विभाजन चार भागांत केले, ज्यामुळे त्यांचा अभ्यास करणे सोपे झाले.

**चार वेद आणि त्यांची वैशिष्ट्ये**

वेद मुख्यतः चार आहेत. प्रत्येक वेदाचे स्वतःचे महत्त्व आणि विषय आहेत:

**१. ऋग्वेद** : हा सर्वात प्राचीन वेद आहे. यात देवतांची स्तुती आहे. ऋग्वेदात दहा मंडले, १०२८ सुक्ते, १०,००० हून अधिक ऋचा आहेत. ऋग्वेद या ग्रंथाला संयुक्त राष्ट्रे शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक संस्था म्हणजेच युनेस्को या संस्थेने जागतिक मानवी वारसा घोषित केले आहे. ऋग्वेदात गायत्री, सावित्री, अनुष्टुभ, त्रिष्टुभ, जगती इ. छंदप्रकारात काव्य निर्माण केले आहे.

**२. यजुर्वेद** : यात यज्ञ आणि कर्मकांड करण्यासाठी लागणारे मंत्र आहेत.

शुक्ल यजुर्वेद आणि कृष्ण यजुर्वेद असे दोन भाग यजुर्वेदाचे आहेत. यजुर्वेदात यज्ञसंस्थेचे विवेचन आढळते.यातूनच भूमितीचा जन्म झाला आहे. शुल्बसूत्रातून त्रिकोणमिती ही ज्ञानशाखा आकाराला आली.

**३. सामवेद** : हा वेद संगीत आणि गायनाशी संबंधित आहे. ऋग्वेदातील मंत्रांचे गायन कसे करावे? याचे नियम आणि पद्धती याचे वर्णन सामवेदात केले आहे.वेद उच्चारायचे कसे? याचे विवेचन केले आहे. हा वेद भारतीय शास्त्रीय संगीताचा मूळ स्रोत मानला जातो.

**४. अथर्ववेद** : हा वेद दैनंदिन जीवनातील समस्या आणि उपाय यावर आधारित आहे. यात जादू-टोणा, आरोग्य, औषधशास्त्र(आयुर्वेद), आणि गृहनिर्माण याबद्दल माहिती आहे.

## वेदांचे चार भाग

प्रत्येक वेद खालील चार भागांमध्ये विभागलेला आहे:

**१. संहिता** : हा वेदांचा मूळ भाग आहे, ज्यात केवळ मंत्र आणि स्तोत्रे आहेत.

**२. ब्राह्मणे**: यात यज्ञ आणि विधी कसे करावेत याबद्दलचे गद्य भाष्य आहे.

**३. आरण्यके** : हे जंगल किंवा आश्रमात अभ्यासले जाणारे भाग आहेत. यात कर्मकांडातून तत्त्वज्ञानाकडे जाणारे चिंतन आहे.

**४. उपनिषदे** : वेदांचा अंतिम भाग (वेदान्त). यात तत्त्वज्ञान, आत्मज्ञान, ब्रह्मज्ञान आणि गूढ विद्या यावर गहन चर्चा आहे. उपनिषदांमध्ये आत्मज्ञान, तत्त्वज्ञान, ब्रह्मज्ञान आणि जीवनातील गहन विचारांवर भर दिला आहे.

## वेदांचे महत्त्व

**१. सांस्कृतिक वारसा**: हे भारतीय संस्कृती, धर्म आणि जीवनशैलीचे मूळ आहेत.

**२. भाषा आणि व्याकरण**: वेदांमुळेच संस्कृत भाषेचे व्याकरण (उदा. पाणिनीचे व्याकरण) विकसित झाले.

**३. वैज्ञानिक आधार**: वेदांमध्ये गणित, खगोलशास्त्र, हवामान आणि आरोग्य याबद्दलचे अनेक वैज्ञानिक संकेत आढळतात.

## वेदांग

'वेदांग' म्हणजे वेदांची अंगे होय. वेदांचे योग्य प्रकारे अध्ययन, आकलन आणि वैदिक विधींचे (यज्ञ इ.) अचूक पालन करण्यासाठी ज्या सहा सहायक शास्त्रांची निर्मिती झाली, त्यांना वेदांगे म्हणतात.

वेदांना एका पुरुषाची कल्पना करून ही सहा शास्त्रे त्याची विविध अंगे (अवयव) मानली जातात.

**वेदांगे एकूण सहा आहेत, ती पुढीलप्रमाणे :**

| वेदांग (शास्त्र) | वेदांगातील स्थान | मुख्य विषय/उपयोग |
|---|---|---|
| शिक्षा | नाक(घ्राणं) | उच्चारणशास्त्र. वेद मंत्रांतील वर्ण (अक्षरे), स्वर (उदात्त, अनुदात्त, स्वरित) आणि मात्रा (ऱ्हस्व, दीर्घ, प्लुत) यांचे अचूक व शुद्ध उच्चार कसे करावेत, याचे मार्गदर्शन. |
| कल्प | हात (हस्तौ) | विधीशास्त्र. यात यज्ञादी धार्मिक विधी, सोळा संस्कार आणि आचारधर्म यांचे नियम व पद्धती सांगितलेल्या आहेत. (यात श्रौतसूत्रे, गृह्यसूत्रे, धर्मसूत्रे, शुल्बसूत्रे यांचा समावेश होतो.) |
| व्याकरण | मुख (मुखं) | शब्दशास्त्र. वेद मंत्रांमधील शब्दांचे स्वरूप, शुद्धता आणि अर्थाचे ज्ञान होण्यासाठी हे शास्त्र महत्त्वाचे आहे. पाणिनीचे 'अष्टाध्यायी' हा व्याकरण ग्रंथ सर्वात प्रसिद्ध आहे. अष्टाध्यायीत भाषेची चौदा सूत्रे 'शिवसूत्रे' मानली गेली आहेत. अगस्ती ऋषींनी 'तोलकाप्पियम' हे तमिळ भाषेचे व्याकरण निर्माण केले आहे. |
| निरुक्त | कान (श्रोत्र) | शब्दव्युत्पत्तीशास्त्र. वेद मंत्रांतील कठीण शब्दांचे अर्थ आणि त्यांची व्युत्पत्ती (मूळ) स्पष्ट करणे. (यास्काचार्यांचे निरुक्त प्रसिद्ध आहे.) |
| छंद | पाय (पादौ) | छंदशास्त्र. वेद मंत्रांची रचना ज्या विशिष्ट नियमांनुसार (उदा. गायत्री, त्रिष्टुप्, जगती छंद) झाली आहे, त्या छंदांची माहिती व नियम सांगणे. |
| ज्योतिष | डोळे (चक्षु) | कालनिर्णय शास्त्र. यज्ञ किंवा धार्मिक विधी कोणत्या योग्य वेळी (तिथी, नक्षत्र) करावेत हे निश्चित करण्यासाठी पंचांग व खगोलशास्त्राचे ज्ञान. |

## वेदांगांचे प्रयोजन

वेदांगांची निर्मिती प्रामुख्याने वेदांचे जतन आणि उपयोग यासाठी झाली. वेदाध्ययन करणारे विद्यार्थी आणि पुरोहित यांना वेद समजून घेण्यासाठी व त्यानुसार कर्मकांडे करण्यासाठी या शास्त्रांची मदत होते.

## सहा वैदिक दर्शने (षड्दर्शने)

षड्दर्शने म्हणजे भारतीय तत्त्वज्ञानातील सहा मुख्य आस्तिक विचारप्रणाली होय. 'दर्शन' या शब्दाचा अर्थ 'पाहणे' किंवा 'सत्य जाणून घेण्याचा दृष्टिकोन' असा होतो. दर्शन या शब्दासाठी ‘तत्त्वज्ञान’ हा शब्ददेखील उपयोजण्यात येतो. ही सर्व दर्शने वेदांना अंतिम प्रमाण मानतात.

**ही सहा दर्शने आणि त्यांचे मुख्य प्रणेते खालीलप्रमाणे आहेत:**

| दर्शन (शाळा) | प्रणेते | मुख्य तत्त्वज्ञान |
|---|---|---|
| सांख्य | महर्षी कपिल | विश्वाची निर्मिती दोन मूलभूत तत्त्वांमधून झाली आहे: प्रकृती आणि पुरुष. दुःख-मुक्तीसाठी या तत्त्वांचे ज्ञान आवश्यक आहे. |
| योग | महर्षी पतंजली | सांख्य तत्त्वज्ञानाला पूरक. चित्तवृत्तींचा निरोध (मनाच्या विचारांवर नियंत्रण) करून समाधी प्राप्त करणे. अष्टांग योगावर आधारित. |
| न्याय | महर्षी गौतम | तर्कशास्त्र आणि ज्ञानमीमांसा यावर भर. वैध ज्ञान (प्रमाण) प्राप्त करण्याचे साधन आणि पद्धतींचे विश्लेषण करते. |
| वैशेषिक | महर्षी कणाद | भौतिक जगाचे आणि पदार्थांचे विश्लेषण. विश्वाची रचना सात पदार्थ आणि अणू यांपासून झाली आहे, असे मानते. |
| मीमांसा (पूर्व मीमांसा) | महर्षी जैमिनी | वेद (विशेषतः कर्मकांडाचे भाग) आणि धार्मिक विधी यांच्या अर्थावर आणि योग्य पालनावर भर देते. |
| वेदान्त (उत्तर मीमांसा) | महर्षी व्यास | उपनिषदे (वेदांचा ज्ञानकांड भाग) यावर आधारित. ब्रह्म आणि आत्मा यांचे स्वरूप समजून घेणे आणि मोक्ष प्राप्त करणे, हे मुख्य लक्ष्य. |

## षड्दर्शनांचे महत्त्व (Significance)

- ही दर्शने भारतीय विचारसरणीचा आधारस्तंभ आहेत.
- ती मोक्ष (मुक्ती) प्राप्त करण्याच्या विविध मार्गांचे आणि तत्त्वज्ञानाचे स्पष्टीकरण देतात.
- न्याय आणि वैशेषिक दर्शनांनी तर्कशास्त्र आणि भौतिक विज्ञानाचा पाया घातला.
- सांख्य आणि योग दर्शनांनी मन आणि शरीराच्या संबंधावर आणि आत्मिक उन्नतीवर लक्ष केंद्रित केले.
- मीमांसा आणि वेदान्त दर्शने थेट वैदिक ज्ञान आणि कर्मकांड यांचा सखोल अभ्यास करतात.
- भारतीय तत्त्वज्ञान आणि आयुर्वेद यांनुसार ही अत्यंत महत्त्वाची मूलभूत तत्त्वे आहेत.

## पंच महाभूते

पंच महाभूते म्हणजे पाच मूलभूत घटक किंवा द्रव्ये ज्यांनी संपूर्ण ब्रह्मांड आणि आपले शरीर बनलेले आहे, असे मानले जाते.

| पंचमहाभूते | मुख्य गुणधर्म | शरीरातील कार्यस्थान |
|---|---|---|
| पृथ्वी | स्थिरता, घनत्व, कठीणपणा | हाडे, मांस, नखे, केस (Solid Structure) |
| आप | तरलता, शीतलता, ओलावा | रक्त, पाणी, रस (Liquids) |
| तेज | उष्णता, प्रकाश, रूपांतरण | पचन, चयापचय (Metabolism), शरीराचे तापमान |
| वायू | गती, हलकेपणा, कोरडेपणा | श्वासोच्छ्वास, हालचाल, चेतासंस्थेचे वहन |
| आकाश | अवकाश, पोकळी, छिद्र | शरीरातील पोकळी ( उदा. कान, पोट, छाती) |

## तन्मात्रा

तन्मात्रा म्हणजे सूक्ष्म ज्ञानविषय होय . ही पंच महाभूतांच्या आधीची अवस्था आहे आणि पंच ज्ञानेंद्रियांना त्यांच्या विषयांचा अनुभव घेण्यासाठी आधार देतात.

| तन्मात्रा | संबंधित महाभूत | संबंधित ज्ञानेंद्रिय |
|---|---|---|
| शब्द | आकाश | कान (श्रोत्र) |
| स्पर्श | वायू | त्वचा (त्वक्) |
| रूप | तेज | डोळे (चक्षू) |
| रस | आप (जल) | जीभ (रसना) |
| गंध | पृथ्वी | नाक (घ्राण) |

तन्मात्रा या सूक्ष्म असल्याने, त्यांचे स्थूल स्वरूप पंच महाभूतांच्या स्वरूपात प्रकट होते, ज्याचा अनुभव पंच ज्ञानेंद्रियांना येतो.

## पंच ज्ञानेंद्रिय

ज्ञानेंद्रिये म्हणजे ज्ञान ग्रहण करणारी इंद्रिये होय. बाह्य जगाचे ज्ञान मिळवण्यासाठी ही पाच इंद्रिये आपल्याला मदत करतात.

| ज्ञानेंद्रिय | कार्यज्ञान / विषय |
|---|---|
| श्रोत्र (कान) | ऐकणे (शब्द ग्रहण करणे) |
| त्वक् (त्वचा) | स्पर्श अनुभवणे (शीत, उष्ण, मृदू, कठोर) |
| चक्षू (डोळे) | पाहणे. (रूप, रंग आणि आकार) |
| रसना (जीभ) | चव घेणे.( षड्रस- मधुर, अम्ल, लवण, कटू, तिक्त, कषाय) |
| घ्राण (नाक) | वास घेणे.(गंधाचे ज्ञान) |

हे सर्व घटक भारतीय तत्त्वज्ञानात, विशेषतः सांख्य दर्शनात आणि आयुर्वेदात, मानवी शरीर आणि विश्वाच्या संरचनेचा आधार मानले जातात.

पंचकोश

पंचकोश हा भारतीय तत्त्वज्ञानातील, विशेषतः वेदान्त (उपनिषदे) आणि योगामध्ये अत्यंत महत्त्वाचा सिद्धांत आहे.

'कोश' म्हणजे आवरण किंवा म्यान. आत्म्याभोवती असलेली ही पाच आवरणं आहेत, जी आपल्या अस्तित्वाचे वेगवेगळे स्तर दर्शवतात. आत्म्याला (ब्रह्माला) जाणण्यासाठी या पाचही स्तरांचे ज्ञान आणि त्यांचा अनुभव घेणे आवश्यक आहे.

## पंचकोश (पाच आवरण)

| कोशाचे नाव | मराठी अर्थ | संबंधित देह | मुख्य स्वरूप व उद्देश |
|---|---|---|---|
| अन्नमय कोश | अन्नाने बनलेले आवरण | स्थूल देह | १.अन्न आणि पाण्याची निर्मिती.<br>२.आपले दृश्य शरीर, हाडे, मांस, रक्त, स्नायू.<br>३.योगात आसन, शुद्ध आहार आणि क्रियांनी या कोशाचे पोषण होते. |
| प्राणमय कोश | प्राणशक्तीचे आवरण | सूक्ष्म देह | १.शरीरातील प्राणशक्ती किंवा ऊर्जा. पाच वायू (प्राण, अपान, व्यान, समान, उदान आणि नाड्या )<br>२.श्वासोच्छवास आणि रक्ताभिसरण नियंत्रित करतो.<br>३.योगात प्राणायामाने या कोशाचे शुद्धीकरण होते. |
| मनोमय कोश | मनाचे आवरण | सूक्ष्म देह | १.मन आणि पंच ज्ञानेंद्रिये<br>२.विचार व भावना या राग, द्वेष, हर्ष, शोक, इच्छा, संकल्पविकल्प या स्तरावर निर्माण होतात<br>३.भक्ती आणि मंत्रजपाने या कोशावर नियंत्रण मिळवता येते. |
| विज्ञानमय कोश | बुद्धी/ज्ञानशक्तीचे आवरण | सूक्ष्म देह | १.बुद्धी आणि कर्मेन्द्रिये<br>२.निर्णयक्षमता, विवेक, तर्कशक्ती, सत्यासत्य ओळखण्याची क्षमता या कोशात असते.<br>३.ध्यान आणि चिंतनाने हा कोश विकसित होतो. |
| आनंदमय कोश | आनंदाचे आवरण | कारण देह | १.हे आत्म्याच्या सर्वात जवळचे आणि अत्यंत सूक्ष्म आवरण आहे.<br>२.गाढ झोप (सुषुप्ती) आणि समाधी अवस्थेत याचा अनुभव येतो<br>३.इथे केवळ आनंद असतो हा कोश मोक्षप्राप्तीनंतर विलय पावतो. |

**पंचकोशांचे महत्त्व**

**१. समग्र दृष्टिकोन**: पंचकोश आपल्याला केवळ भौतिक शरीर (अन्नमय कोश) नव्हे, तर ऊर्जा, मन, बुद्धी आणि आनंद या सर्व स्तरांवर स्वतःचे आकलन करण्यास मदत करतात.

**२. योगाचा आधार**: योग आणि ध्यान साधना या पाचही कोशांवर काम करतात. उदा. आसन हे अन्नमय कोशासाठी, प्राणायाम प्राणमय कोशासाठी, आणि ध्यान मनोमय/विज्ञानमय कोशासाठी असते.

**३. रोगमुक्ती**: आयुर्वेद आणि योग मानतात की रोग केवळ अन्नमय कोशात नसतात, तर ते प्राणमय किंवा मनोमय कोशातील असंतुलनातून (imbalances) सुरू होतात. त्यामुळे संपूर्ण स्तरावर उपचार आवश्यक असतो.

हे पाच कोश एकमेकांना व्यापून टाकतात आणि आत्म्याचे स्वरूप झाकतात. योग आणि अध्यात्मिक साधनेचा उद्देश या कोशांच्या आवरणातून बाहेर पडून आत्म्याचे शुद्ध स्वरूप जाणणे हा असतो.

## वेद आणि त्यांचे उपवेद

वेदांच्या प्रत्येक भागाशी संबंधित असलेले उपवेद (Upavedas) खालीलप्रमाणे आहेत. उपवेद हे वेदांच्या ज्ञानाला पूरक असणारे, व्यावहारिक जीवनातील कला, विज्ञान आणि कौशल्ये यांवर आधारित ग्रंथ आहेत.

वेदांचे उपवेद

वेदांचे उपवेद एकूण चार आहेत. प्रत्येक उपवेद एका विशिष्ट वेदाशी संबंधित आहे:

**उपवेदांचे महत्त्व**

• उपवेद हे दर्शवतात की वैदिक संस्कृतीत केवळ धार्मिक कर्मकांडेच नव्हे, तर आरोग्य, कला, संरक्षण आणि स्थापत्य यांसारख्या व्यावहारिक विज्ञानांना देखील महत्त्व दिले गेले होते.

• यातील आयुर्वेद आणि गांधर्ववेद (संगीत) आजही जगातील अनेक संस्कृतींमध्ये प्रभावी आहेत.

| वेद | उपवेद | मुख्य विषयज्ञान/ क्षेत्र |
|---|---|---|
| ऋग्वेद | आयुर्वेद | आरोग्य आणि जीवन विज्ञान. यामध्ये मानवी शरीर, रोगनिदान, उपचार, औषधी वनस्पती आणि दीर्घायुष्याचे नियम समाविष्ट आहे. |
| यजुर्वेद | धनुर्वेद | युद्धकला आणि सैन्य विज्ञान. यामध्ये शस्त्र चालवण्याचे ज्ञान, युद्धनीती आणि संरक्षण तंत्रांचा समावेश आहे. |
| सामवेद | गांधर्ववेद | संगीत, नृत्य आणि कला विज्ञान. यामध्ये गायन, वादन, नाट्य आणि ललित कलांचे नियम व सिद्धान्त दिले आहेत. |
| अथर्ववेद | अर्थवेद / स्थापत्यवेद | निर्माण कला आणि समाज विज्ञान. यामध्ये स्थापत्य, नगररचना, शिल्पकला आणि अर्थशास्त्राचे ज्ञान समाविष्ट आहे. |

## भारतीय पुरुषार्थ

पुरुषार्थ ही भारतीय तत्त्वज्ञान, विशेषतः हिंदू धर्मातील एक मूलभूत संकल्पना आहे. 'पुरुषार्थ' म्हणजे मानवी जीवनाचे अंतिम ध्येय किंवा उद्देश.मानवी जगण्याच्या मूलभूत प्रेरणा म्हणजे ‘पुरुषार्थ’ होय. मनुष्याने आपल्या संपूर्ण आयुष्यात साध्य करायच्या अशा चार मुख्य बाबी मानल्या जातात, ज्यामुळे त्याला परिपूर्ण आणि अर्थपूर्ण जीवन जगता येते.हे पुरुषार्थ एकूण चार आहेत.

| पुरुषार्थ | मराठी अर्थ | मुख्य स्वरूप व उद्देश |
|---|---|---|
| धर्म | कर्तव्य / नीतिमत्ता | १. योग्य आचरण, कर्तव्यनिष्ठा आणि नीतीचे पालन करणे. |
| अर्थ | संपत्ती/ आर्थिक प्रगती | १. जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेली भौतिक साधने, संपत्ती आणि आर्थिक स्थैर्य प्राप्त करणे. |
| काम | इच्छा/ आनंद | १. प्रेम, लैंगिक संबंध, कला आणि इंद्रियांच्या माध्यमातून मिळणारा आनंद व इच्छांची पूर्ती करणे.<br>२. अर्थ आणि धर्माच्या चौकटीत राहूनच 'काम' (इच्छा) पूर्ण करणे महत्त्वाचे आहे . |
| मोक्ष | मुक्ती/ अंतिम स्वातंत्र्य | १. जन्म-मृत्यूच्या चक्रातून (संसारातून) मुक्ती मिळवणे.<br>२. आत्म्याचे अंतिम सत्य जाणणे आणि ब्रह्मतत्त्वाशी एकरूप होणे. |

**पुरुषार्थांचे संतुलन**

भारतीय विचारानुसार, एका संतुलित आणि यशस्वी जीवनासाठी या चारही पुरुषार्थांमध्ये योग्य समन्वय राखणे आवश्यक आहे:

१.धर्म हा अर्थ (संपत्ती) आणि काम (इच्छा) या दोहोंना नियंत्रित करणारा मूलभूत आधार आहे.

२.भारतीय संस्कृतीत मानवी कामप्रेरणांचा आदर केलेल्या आढळतो.कामप्रेरणेचे उन्नयन भारतीय संस्कृतीत दिसते.

३.अर्थ व काम धर्माधिष्ठीत असले पाहिजे, असे भारतीय परंपरेत म्हटले जाते.

४ धर्म याचा अर्थ कर्तव्य, न्याय, नीती असे अनेक आहेत.

५.केवळ भौतिक सुखांच्या (अर्थ आणि काम) मागे न लागता, मानवाने धर्माचे पालन करत मोक्षाचे अंतिम ध्येय साधण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

६.भारतीय संस्कृतीत अंतिम प्रेरणा मोक्ष म्हणजे जन्म-मरणाच्या बंधनातून

थोडक्यात, मानवी जीवन हे धर्म (कर्तव्य) आणि मोक्ष (मुक्ति) यांच्या दरम्यान अर्थ (साधने) आणि काम (इच्छा) यांचा अनुभव घेण्यासाठी दिलेले आहे, अशी पुरुषार्थांची संकल्पना आहे.

## भारतीय ज्ञानप्रणाली आणि विविध ग्रंथ

**अष्टाध्यायी**

अष्टाध्यायी हा पाणिनी यांनी लिहिलेला संस्कृत भाषेच्या व्याकरणाचा ग्रंथ आहे. ह्या ग्रंथात आठ अध्याय असून त्यांवरूनच ‘अष्टाध्यायी’ हे नाव ह्या ग्रंथाला मिळाले आहे. संस्कृत भाषेच्या व्याकरणावर विविध ग्रंथ लिहिले गेले असले तरी अष्टाध्यायीच्या अध्ययनाची परंपरा आजवर चालत आलेली आहे. तसेच ह्या ग्रंथाला इतर संस्कृत व्याकरणाच्या ग्रंथांच्या तुलनेत अधिक कीर्ती लाभली आहे.अष्टाध्यायी ह्या ग्रंथावर वार्तिके, टीका, भाष्ये अशा स्वरूपाचे अनेक ग्रंथ लिहिले गेले. त्यातून पाणिनीय व्याकरणपरंपरा ह्या नावाने ज्ञात असलेली परंपरा निर्माण झाली. जगभरातील अनेक अभ्यासकांनी ह्या ग्रंथाविषयी आणि ह्या ग्रंथाद्वारे पुढे निर्माण झालेल्या परंपरेविषयी चिकित्सक स्वरूपाचे लेखन केले आहे. भाषाभ्यासाच्या काही

परंपरांवर ह्या पाणिनीय परंपरेचा प्रभाव पडलेला आहे. अष्टाध्यायी हा ग्रंथ विलक्षण तांत्रिक स्वरूपाचा असून सूत्ररूप ग्रंथ आहे. अष्टाध्यायीत सुमारे चार हजार सूत्रे आहेत.

**कामसूत्र**

कामसूत्र हा महर्षी वात्स्यायन यांनी लिहिलेला एक प्राचीन संस्कृत ग्रंथ ७ विभागांमध्ये विभागलेला ग्रंथ असून, त्यात केवळ लैंगिक संबंधांबद्दलच नाही, तर दाम्पत्य जीवन, प्रेम, सौंदर्य आणि सामाजिक जीवनाशी संबंधित अनेक पैलूंवर मार्गदर्शन आहे. जे विवाहसंबंधांना अधिक सुखी आणि परिपूर्ण बनवण्यासाठी उपयुक्त ठरतात. हे पुस्तक लैंगिक जीवनासोबतच स्त्री-पुरुषांमधील नातेसंबंध, कला, संगीत आणि जीवनशैली यावरही मार्गदर्शन करते, जे आजच्या काळातही प्रासंगिक आहे.अनेक लोक याला फक्त लैंगिक संबंधांचा ग्रंथ मानतात, पण ते चुकीचे आहे. हा ग्रंथ संपूर्ण मानवी जीवनावर आधारित आहे.यशस्वी वैवाहिक जीवनासाठी आणि लैंगिक संबंध अधिक आनंददायी बनवण्यासाठी यातील सूत्रे उपयोगी पडतात.

थोडक्यात, ‘कामसूत्र’ हा एक व्यापक ग्रंथ आहे जो मानवी संबंधांना अधिक समृद्ध करण्यासाठी मार्गदर्शन करतो.

**निरुक्त**

यास्काचार्य हे प्राचीन भारतीय व्याकरणकार आणि भाषाशास्त्रज्ञ होते, ज्यांनी 'निरुक्त' नावाचा संस्कृत भाषेतील वेदांगावर प्रथम भाष्य-ग्रंथ लिहिला, जो वेदांमधील कठीण शब्दांचे अर्थ आणि त्यांची व्युत्पत्ती (मूळ) स्पष्ट करतो; हा ग्रंथ वैदिक साहित्यातील एक महत्त्वाचा भाग असून, वेदांचा अर्थ समजून घेण्यासाठी अत्यंत उपयुक्त मानला जातो. निरुक्त हे वेदांगांपैकी एक आहे आणि निरुक्ताशिवाय वेदांचा अभ्यास अपूर्ण मानला जातो. निरुक्त या शब्दाचा अर्थ 'स्पष्टपणे सांगितलेले' किंवा 'अर्थ लावलेले'

असा आहे. निरुक्त ही वैदिक साहित्याच्या व्युत्पत्तीची चर्चा आहे. हा ग्रंथ 'निघंटू' नावाच्या वैदिक शब्दांच्या प्राचीन शब्दकोशावर आधारित आहे. निरुक्त-निघंटू वेदांमधील कठीण शब्दांचा नेमका अर्थ समजून घेणे, शब्दांची व्युत्पत्ती (etymology) आणि त्यांचे विविध अर्थ स्पष्ट करणे हा यास्काचार्यांचा मुख्य हेतू होता.निरुक्ताचे १२ अध्याय आहेत, ज्यांचे पूर्वषट्क (पहिले ६) आणि उत्तरषट्क (पुढील ६) असे दोन भाग आहेत.
निरुक्तामुळे वेदांमधील शब्दांचा अर्थ स्पष्ट होतो, ज्यामुळे वेदांचे ज्ञान अधिक खोलवर समजण्यास मदत होते. म्हणूनच यास्काचार्यांना 'वेदांचे भाष्यकार' म्हटले जाते आणि त्यांची तुलना सूर्याशी केली जाते, जो अंधार दूर करून प्रकाश देतो.
थोडक्यात, यास्काचार्य यांचे 'निरुक्त' हे वैदिक संस्कृत शब्दांच्या अर्थाचे आणि भाषेच्या शास्त्राचे प्राचीन आणि मूलभूत ज्ञान आहे.

**लीलावती**

लीलावती हा प्रसिद्ध भारतीय गणितज्ञ भास्कराचार्य (भास्कर द्वितीय) यांनी लिहिलेला गणितावरील एक महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे, जो त्यांच्या 'सिद्धान्तशिरोमणी' या मुख्य ग्रंथाचा पहिला भाग आहे; 'सिद्धान्तशिरोमणी' या ग्रंथाचे 'लीलावती', 'बीजगणित', 'ग्रहगणिताध्याय' आणि 'गोलाध्याय' असे चार भाग आहेत. लीलावती या ग्रंथात अंकगणित, भूमितीचे प्रश्न श्लोकांच्या रूपात सोप्या आणि मनोरंजक पद्धतीने मांडले आहेत, ज्यामुळे गणित शिकवणे सोपे होते. लीलावती हा ग्रंथ सुमारे ६०० वर्षे गणित शिकवण्यासाठी पाठ्यपुस्तक म्हणून वापरला गेला. अंकगणित, भूमिती, व्यावहारिक गणित ही या ग्रंथाचे मुख्य विषय आहेत. लीलावती हा ग्रंथ गणित शिकवण्याचा एक आदर्श नमुना आहे व प्राचीन भारतात गणित शिक्षणासाठी खूप लोकप्रिय होता. लीलावती ही भास्कराचार्यांची कन्या होती. ज्योतिषशास्त्रावर आधारित त्यांच्या एका गणनेनुसार, त्यांच्या मुलीचा विवाह जुळला नाही. त्यानंतर भास्कराचार्यांनी लीलावतीला गणित शिकवण्यासाठी हा ग्रंथ तयार केला, असे म्हटले जाते.

# बौद्ध आणि जैन विचारांतील ज्ञान परंपरा

बौद्ध तत्त्वज्ञानातील चार आर्यसत्ये, अष्टांग मार्ग यांतून बौद्ध ज्ञानप्रणाली आकाराला येते.बौद्ध तत्त्वज्ञानातील अनित्य, अनात्म, शून्यवाद, प्रतित्य समुत्पाद इ. तत्त्वे आणि संकल्पना कमालीच्या वैज्ञानिक व शास्त्रशुद्ध आहेत.विश्व सत्याचे स्वरूप 'अद्वैत' आहे, असे वैदिक, जैन, बौद्ध या तीनही परंपरांमध्ये मानले जाते.

**बौद्ध ज्ञानप्रणाली**

**आर्यसत्ये**

आर्यसत्ये ही गौतम बुद्धांच्या उपदेशाचा आणि बौद्ध धर्माच्या तत्त्वज्ञानाचा मूळ आधारस्तंभ आहेत. बुद्धांनी ज्ञानप्राप्तीनंतर सर्वप्रथम जी शिकवण दिली, तिलाच ही चार आर्यसत्ये म्हणतात.

'आर्य' म्हणजे श्रेष्ठ, उत्तम, सत्य म्हणजे वास्तव होय. आर्यसत्य म्हणजे 'श्रेष्ठ वास्तव' होय.

ही चार आर्यसत्ये खालीलप्रमाणे आहेत:

**१. दुःख**

मानवी जीवन हे दुःखमय आहे.

जन्म घेणे, म्हातारपण, आजारपण आणि मृत्यू हे दुःखच आहेत. याशिवाय, अप्रिय गोष्टींशी संबंध येणे, प्रिय गोष्टींपासून दूर होणे आणि आपली इच्छा पूर्ण न होणे हे देखील दुःखच आहे.

जगात कोणतीही गोष्ट कायमस्वरूपी नाही (अनित्य) आणि म्हणून सर्व भौतिक किंवा भावनात्मक अनुभव शेवटी दुःखाकडेच घेऊन जातात.

**२. दुःख-समुदय**

या दुःखाला कारण आहे.

दुःखाचे मूळ कारण म्हणजे तृष्णा किंवा तण्हा होय. ही तृष्णा म्हणजे
सुखांची तीव्र इच्छा.

अस्तित्व टिकवून ठेवण्याची इच्छा.

स्वतःचे अस्तित्व नष्ट करण्याची इच्छा (आत्महत्या)
·ही तृष्णा अज्ञानातून निर्माण होते आणि सतत बदलणाऱ्या गोष्टींमध्ये 'मी' आणि 'माझे' आहे, असे मानण्यामुळे दुःख निर्माण होते.

**३. दुःख-निरोध**

दुःखाचा अंत करणे शक्य आहे.
जर दुःखाचे कारण 'तृष्णा' असेल, तर त्या तृष्णेचा पूर्णपणे त्याग करणे शक्य आहे. तृष्णा नष्ट झाली की दुःख नष्ट होते आणि निर्वाण प्राप्त होते.
निर्वाण म्हणजे केवळ दुःखाचा अंत नाही, तर जन्म-मृत्यूच्या चक्रातून मुक्ती आणि परम शांतता प्राप्त करणे.

**४. दुःख-निरोध-मार्ग**

दुःखाचा अंत करण्यासाठी मार्ग आहे.
दुःखाचा अंत करून निर्वाण प्राप्त करण्याचा मार्ग म्हणजे आर्य अष्टांगिक मार्ग होय. हा मार्ग मध्य मार्ग म्हणून ओळखला जातो, कारण तो अति-भोगापासून आणि अति-त्यागापासून दूर राहण्याचा उपदेश करतो.

**आर्य अष्टांगिक मार्ग**

आर्य अष्टांगिक मार्ग हा मार्ग प्रज्ञा, शील आणि समाधी या तीन भागांमध्ये विभागलेला आहे:

**१.सम्यक् दृष्टी** - चार आर्यसत्ये योग्य प्रकारे समजून घेणे. (प्रज्ञा)
**२.सम्यक् संकल्प** - योग्य आणि निःस्वार्थ विचार करणे. (प्रज्ञा)
**३.सम्यक् वाचा**- खोटे न बोलणे, कठोर शब्द न वापरणे. (शील)
**४.सम्यक् कर्मान्त**- हिंसा न करणे, चोरी न करणे, योग्य आचरण करणे. (शील)
**५.सम्यक् आजीविका** - शुद्ध मार्गाने उपजीविका करणे. (शील)
**६.सम्यक् व्यायाम** -चांगल्या गोष्टींसाठी प्रयत्न करणे आणि वाईट विचार दूर ठेवणे. (समाधी)

**७.सम्यक् स्मृती** - शरीर, भावना, मन आणि धर्माचे योग्य भान ठेवणे. (समाधी)
**८.सम्यक् समाधी** - चित्ताची एकाग्रता साधणे. (समाधी)

**प्रतीत्य समुत्पाद**

प्रतीत्य समुत्पाद हा बौद्ध धर्मातील सर्वात महत्त्वाचा आणि मूलभूत सिद्धांत आहे. याला कार्य-कारणभाव किंवा परस्पर अवलंबित्व असेही म्हणतात.
हा सिद्धांत भगवान बुद्धांनी दुःख आणि जन्म-मृत्यूच्या चक्राचे (संसाराचे) मूळ आणि ते कसे कार्यरत आहे, हे स्पष्ट करण्यासाठी मांडला.

**सिद्धांताचे सार**

**अर्थ**: 'प्रतीत्य' म्हणजे अवलंबून असणे आणि 'समुत्पाद' म्हणजे निर्माण होणे किंवा उगवणे.

**मूलभूत सूत्र**: "जेव्हा हे असते, तेव्हा ते होते; याचा उदय झाल्यास, त्याचा उदय होतो."

**सिद्धांत**: जगात अस्तित्वात असलेली प्रत्येक गोष्ट, प्रत्येक घटना आणि प्रत्येक अनुभव हा दुसऱ्या कशावरतरी अवलंबून असतो. कोणतीही गोष्ट स्वतंत्रपणे किंवा अकारण निर्माण होत नाही.

प्रतीत्य समुत्पाद हा सिद्धांत बौद्ध धर्माच्या अत्यंत खोल विचारसरणीचे प्रतिनिधित्व करतो.

**जैन ज्ञानप्रणाली**

जैन ज्ञानप्रणालीतील स्यादवाद आणि अनेकांतवाद या संकल्पना शास्त्रशुद्ध आहेत.

**स्यादवाद**

स्यादवाद हा जैन तत्त्वज्ञानाचा एक अत्यंत महत्त्वाचा आणि मूलभूत सिद्धांत आहे. हा सिद्धांत वस्तूच्या अनेक पैलूंचा आणि सापेक्षतेचा विचार करतो, ज्यामुळे तो बौद्धिक सहिष्णुतेसाठी (Intellectual Tolerance) ओळखला जातो.

'स्यादवाद' चा अर्थ

**स्यात्** :या शब्दाचा अर्थ 'कदाचित', 'असावे', किंवा 'एका विशिष्ट दृष्टिकोनातून' असा होतो. 'केवळ' किंवा 'नक्कीच' या अर्थाने हा शब्द वापरला जात नाही.

**वाद**: म्हणजे सिद्धांत किंवा मत.

स्यादवाद याचा अर्थ 'सापेक्ष दृष्टिकोनाचा सिद्धांत' किंवा 'सत्याच्या अनेक पैलूंचा सिद्धांत' असा होतो.

**प्रमुख सिद्धांत**

स्यादवाद सांगतो की, कोणत्याही वस्तूचे स्वरूप अनेक पैलूंचे असते. आपले ज्ञान मर्यादित असल्याने, आपण त्या वस्तूचे संपूर्ण ज्ञान एका वेळी व्यक्त करू शकत नाही. त्यामुळे कोणताही निर्णय (Judgment) हा सापेक्ष आणि अंशतः खरा असतो, तो पूर्णतः सत्य नसतो.

सत्य हे सापेक्ष आणि अनेक पैलूंचे असल्यामुळे, कोणतीही गोष्ट केवळ 'आहे' किंवा केवळ 'नाही' असे एकतर्फी विधान करणे चुकीचे आहे.

महत्त्व

- स्यादवाद लोकांना विविध दृष्टिकोन स्वीकारण्याची आणि मतभेद सहन करण्याची शिकवण देतो.
- हा सिद्धांत आग्रह आणि एकतर्फी विचार टाळतो.
- हा सिद्धांत जैन धर्माच्या अनेकांतवाद या व्यापक तत्त्वज्ञानाचा तार्किक भाग आहे.

**अनेकांतवाद**

अनेकांतवाद हा जैन धर्माचा एक महत्त्वाचा आणि मध्यवर्ती सिद्धांत आहे, ज्याचा अर्थ 'अनेक दृष्टिकोन' असा होतो. 'अनेकांतवाद' म्हणजे सत्याच्या अनेक पैलूंचा सिद्धांत किंवा विविध दृष्टिकोन स्वीकारणे होय. हा सिद्धांत सांगतो की कोणत्याही घटनेचे अनेक पैलू असू शकतात आणि त्यापैकी कोणताही एक दृष्टिकोन पूर्ण सत्य नाही. याचा अर्थ सत्याची अनेक बाजू असू शकतात आणि त्या सर्व एकाच वेळी अस्तित्वात असू शकतात.

**जैन धर्मातील महत्त्व**: अनेकांतवाद हे जैन धर्माचे दोन प्रमुख तत्त्वांपैकी एक आहे; दुसरे तत्त्व म्हणजे अहिंसा. आचारात अहिंसा आणि विचारात अनेकांतवाद ही जैन धर्माच्या रथाची दोन चाके मानली जातात.

**व्यावहारिक उपयोग**: हा सिद्धांत आपल्याला विविध दृष्टिकोन समजून घेण्यास मदत करतो आणि त्यामुळे संघर्ष टाळता येतो.

**समृद्ध विचार**: अनेकांतवाद आपल्याला कोणत्याही गोष्टीकडे एकाच दृष्टिकोनातून न पाहता, विविध पैलूंचा विचार करण्यास शिकवतो. यामुळे आपल्याला अधिक व्यापक आणि संतुलित दृष्टिकोन मिळतो.

हा सिद्धांत सांगतो की वास्तव हे अनेक पैलूंचे (अनेकांत) आणि अनेक गुणधर्मांचे असते. त्यामुळे कोणत्याही एका दृष्टिकोनातून किंवा विचारातून सत्याचा संपूर्ण अनुभव घेणे शक्य नाही.

## भारतीय ज्ञान परंपरेची प्रमुख क्षेत्रे

**१. वेद आणि उपनिषदे**:

**मूलस्तंभ**: ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद हे भारतीय ज्ञानाचे मूळ आधार आहेत.

**तत्त्वज्ञान**: उपनिषदांमध्ये आत्मज्ञान, तत्त्वज्ञान, ब्रह्मज्ञान आणि जीवनातील गहन विचारांवर भर दिला आहे.

**२. शिक्षण प्रणाली (प्राचीन)**:

**केंद्र**: तक्षशिला, नालंदा, विक्रमशिला यांसारखी प्राचीन विद्यापीठे.

**पद्धत**: गुरुकुल पद्धती ही ज्ञानार्जनाची महत्त्वाची प्रणाली होती, जिथे विद्यार्थी गुरूच्या घरी राहून शिक्षण घेत असत.

**ध्येय**: केवळ पुस्तकी ज्ञान नाही, तर नैतिक, भौतिक, आध्यात्मिक आणि बौद्धिक मूल्यांचे संवर्धन करणे. (उदा. **"सा विद्या या विमुक्तये"** - जी मुक्ती देते, ती विद्या.)

**३. आरोग्य आणि जीवन**:

आयुर्वेद: ही प्राचीन भारतीय औषध प्रणाली आहे. यामध्ये सर्वांगीण उपचार

आणि शरीर, मन आणि आत्मा यांचे संतुलन यावर जोर दिला जातो.
योग: मानसिक शांती, शारीरिक तंदुरुस्ती आणि आध्यात्मिक उन्नतीसाठी योग महत्त्वाचा मानला जातो.

**४. विज्ञान आणि गणित**:

योगदान: शून्याचा शोध, दशांश प्रणाली, बीजगणित, अंकगणित, त्रिकोणमिती आणि भूमिती यामध्ये भारतीयांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.
विद्वान: आर्यभट्ट, भास्कराचार्य यांसारख्या गणितज्ञांनी खगोलशास्त्रातही मोठी प्रगती केली.

**५. कला आणि साहित्य**:

**कला**: नाट्यशास्त्र, काव्यशास्त्र आणि संगीतशास्त्र यांसारख्या कलांचा विकास झाला.
**ग्रंथ**: रामायण आणि महाभारत यांसारख्या साहित्यातून सांस्कृतिक मूल्ये, नीतिमत्ता आणि जीवनाचे धडे दिले गेले.

## भारतीय ज्ञान प्रणालीची प्रमुख वैशिष्ट्ये:

**समग्र दृष्टिकोन**: भारतीय ज्ञान प्रणाली केवळ एका विषयापुरती मर्यादित नसून, तत्त्वज्ञान, विज्ञान, कला, गणित आणि अध्यात्म यांसारख्या अनेक क्षेत्रांचा समावेश करते.

**ज्ञान हस्तांतरण**: या प्रणालीमध्ये ज्ञान एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक परंपरा, हस्तलिखिते आणि शिलालेख यांसारख्या विविध माध्यमांद्वारे हस्तांतरित केले जाते.

**शाश्वत आणि सुलभ**: ही प्रणाली सर्वसमावेशकता आणि सुलभतेला प्राधान्य देते, ज्यामुळे दर्जेदार शिक्षण सामाजिक-आर्थिक अडथळ्यांना पार

करून सर्वांपर्यंत पोहोचते.

**आधुनिक प्रासंगिकता**: राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP-2020) सारख्या आधुनिक शैक्षणिक उपक्रमांमध्ये भारतीय ज्ञान प्रणालीचा आधार घेतला जात आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना भारतीय वारशाचे ज्ञान मिळते.

**ज्ञानक्षेत्राकडे पाहण्याचा समग्र दृष्टिकोन(Holistic Approach)**: आंतरविद्याशाखीय स्वरूप, ज्ञानाचा प्रश्नाने शोध, वाद -त्याचे शास्त्र व त्यातून सत्याचा शोध, गुरुकुल व गुरु-शिष्य परंपरा, अंतर्ज्ञानाला स्थान(Intuition) ही इतर काही भारतीय ज्ञान प्रणालीची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.भारतीय ज्ञानप्रणाली सर्वंकष आहे.


**भारतीय ज्ञान प्रणालीची प्रमुख उद्दिष्ट**:

भारतीय ज्ञान प्रणालीचे उद्दिष्ट केवळ ज्ञान देणे नसून, विद्यार्थ्यांना त्यांची संस्कृती आणि जीवनशैलीची मुळे समजून घेण्यास मदत करणे आणि त्यांना जागतिक ज्ञानाशी जोडणे हे आहे.

भारतीय ज्ञानपरंपरेतील ज्ञान, कौशल्ये आणि नैतिक मूल्ये आधुनिक शिक्षणात समाविष्ट करून विद्यार्थ्यांना त्यांच्या समृद्ध वारशाची जाणीव करून देणे आणि भारतीयत्वाला केंद्रस्थानी ठेवणे.

## समारोप

भारतीय ज्ञान प्रणालीचे महत्त्व तिच्या समग्र, प्राचीन आणि आधुनिक ज्ञानाच्या संयोजनात आहे, जे व्यक्ती आणि समाजाच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक विकासासाठी आवश्यक आहे. भारतीय ज्ञान प्रणाली ही अत्यंत व्यापक, बहुविद्याशाखीय (Multidisciplinary) आणि मानवी जीवनाच्या सर्व अंगांचा विचार करणारी प्रणाली आहे.राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, स्थापत्य-नगररचना, विश्वोत्पत्तीशास्त्र (Cosmology) इ. विषयांचे ज्ञान भारतीय ज्ञानप्रणालीत आढळते.


॥ सा विद्या या विमुक्त्यें ॥
भारतीय
ज्ञान प्रणाली
परंपरा | तत्वज्ञान | विज्ञान | मूल्ये | शाश्वत विकास
ऋववेद
यजुर्वेद
सामवेद
अथर्ववेद
आयुर्वेद
धनुर्वेद
गंधर्ववेद
शिल्पशास्त्र



महाराष्ट्रीय ज्ञान प्रणाली
ज्ञान • भक्ती • कला • आयुर्वेद • ज्योतिष • परंपरा
ज्ञानेश्वरी
संत ज्ञानेश्वर • ज्ञानेश्वरी (१२९०)
संत तुकाराम • अभंग व भक्ती परंपरा
प्राचीन ज्ञानभांडार • हस्तलिखिते
तुळस
आश्वगंधा
पिंपळी
हळद
आयुर्वेद • औषधी वनस्पती & आरोग्य ज्ञान
वारी परंपरा • पंढरपूरची पायी वारी
वारली कला • लोककला
ज्योतिष • खगोलशास्त्र • नक्षत्र व कालगणना
पैठणी कला • पारंपरिक वस्त्रकला
गुरुकुल परंपरा • मौखिक ज्ञान




ज्ञान हीच खरी संपत्ती,
संस्कार हीच खरी शक्ती,
परंपरेतून नवसंशोधन,
हाच महाराष्ट्राचा मार्ग.
|| श्री ||
महाराष्ट्रीय ज्ञान प्रणाली
परंपरा • अनुभव • विज्ञान • मूल्ये
लोकज्ञान ते शाश्वत भविष्य
बहुजन हिताय
बहुजन सुखाय
ज्ञानाचे स्रोत
वेद – उपनिषदे
आयुर्वेद
गणित – ज्योतिष
शिल्प – वास्तु
कृषि – जलव्यवस्थापन
लोकपरंपरा – लोककला
ज्ञानाची मूल्ये
समन्वय
पर्यावरण पूरकता
समुदाय भाव
कर्तव्य आणि सेवा
नवसंशोधन
सातत्य आणि शाश्वतता
लोककला
लोकसंगीत
हस्तकला
आयुर्वेद
ग्रंथपरंपरा
आहारसंस्कृती
जलसंवर्धन
भूतकाळाचा अभिमान, वर्तमानाची जाण आणि भविष्याची दिशा – हीच महाराष्ट्रीय ज्ञान प्रणाली.

# महाराष्ट्रीय ज्ञान प्रणाली : एक शोध

महाराष्ट्रीय ज्ञान प्रणाली ही एक भारतीय ज्ञान प्रणालीचा भाग आहे, ज्यामध्ये हजारो वर्षांपासून विकसित झालेल्या ज्ञानाचा समावेश आहे, ज्यात विज्ञान, तत्वज्ञान, कला, साहित्य, आयुर्वेद आणि गणित यांसारख्या क्षेत्रांचा समावेश आहे. ही ज्ञान परंपरा मौखिक परंपरा, हस्तलिखिते, शिलालेख आणि पारंपरिक पद्धतींद्वारे पिढ्यानपिढ्या हस्तांतरित होत राहिली आहे.

मध्ययुगीन कालखंडात महाराष्ट्रात तत्त्वज्ञान, नीती, मानसशास्त्र, व्याकरण, वैद्यक, ज्योतिष, गणित इ. क्षेत्रात मराठी, संस्कृत इ. भाषांमध्ये ज्ञान निर्माण झाले. मध्ययुगीन काळात मराठीमध्ये ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, सिद्धांत सूत्रपाठ, दासबोध इ.तत्त्वज्ञानात्मक ग्रंथ निर्माण झाले. मध्ययुगात 'व्याकर्ण', 'सुभाषनिबंधु', 'भाषा मंजरी', 'लिंगत्रय विवंचना', 'लक्षण रत्नाकर', 'महाराष्ट्र भाषाभाष्य'(सुभाष्य), 'पंचवार्तिक', 'नामविभक्ती', 'द्वात्रिशलक्ष्णरत्नाकर', 'व्याकरण' इत्यादी मराठी व्याकरण ग्रंथ रचले गेले. मराठीत तेराव्या शतकापासून व्याकरणे लिहायची सुरू असलेली प्रथा पुढे खंडित झाली.मध्ययुगात विठ्ठल गलंड यांनी 'वैद्यवल्लभ संहिता', 'रत्नमाला', 'रत्नपरिहार', 'रसकौमुदी' इ.आयुर्वेदीय वैद्यक ग्रंथ मराठीत लिहिले आहेत. समर्थ रामदासांचा 'मनाचे श्लोक' हा मनोविश्लेषण करणारा ग्रंथ रचला. प्रसिद्ध गणितज्ज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ 'भास्कराचार्य' ही महाराष्ट्रीय होते, त्यांनी संस्कृतमध्ये लीलावती, बीजगणित हे गणिती ग्रंथ, तर ग्रहगणिताध्याय, गोलाध्याय हे खगोलशास्त्रीय ग्रंथ लिहिले आहेत.

## मराठी तत्वज्ञानात्मक ग्रंथ

मध्ययुगीन काळात मराठीमध्ये ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, सिद्धांत सूत्रपाठ, दासबोध इ.तत्त्वज्ञानात्मक ग्रंथ निर्माण झाले.

ज्ञानेश्वरीमध्ये अध्यात्म आणि विज्ञानाचा अनोखा संगम आढळतो, ज्यात भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, तंत्रज्ञान आणि मानसशास्त्र यांसारख्या विविध विज्ञानाचे मूळ सिद्धांत मांडलेले आहेत. ज्ञानेश्वरीत

आधुनिक विज्ञानाने लावलेले अनेक शोध, जसे की पृथ्वी सूर्याभोवती फिरते हा विचार, ७२५ वर्षांपूर्वीच मांडण्यात आला होता.

**ज्ञानेश्वरीतील विज्ञान**

ज्ञानेश्वरीत खगोलशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, जीवशास्त्र, तंत्रज्ञान, भूगर्भशास्त्र आणि धातुशास्त्र इ.ज्ञानशाखांतील ज्ञानांची मांडणी केली आहे.

**खगोलशास्त्र**: पृथ्वी सूर्याभोवती फिरते, हे आधुनिक खगोलशास्त्राने शोधले आहे. पण, संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीमध्ये ७२५ वर्षांपूर्वीच सूर्य फिरत नाही, तर पृथ्वी फिरते, असे वैज्ञानिक सत्य मांडले आहे.

**भौतिकशास्त्र**: ज्ञानेश्वरीत पदार्थाच्या आणि ऊर्जेच्या स्वरूपाविषयी तसेच क्वांटम फिजिक्समधील 'वेव्ह-पार्टिकल ड्युएलिटी' सारख्या आधुनिक सिद्धांतांशी संबंधित विचारही आढळतात.

ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञान हे ब्रह्मचैतन्य आणि विश्व यांच्यातील नाते यावर आधारित आहे, ज्यामध्ये ईश्वरालाच विश्वाचे आदिकारण आणि नियामक मानले जाते. यात कर्मयोग (कर्म केले पाहिजे पण फळाची आस नसावी), ज्ञानयोग (ज्ञानाचे महत्त्व) आणि भक्तियोग (भक्तीचा मार्ग) यांसारख्या अनेक तत्त्वांचे सुंदर विवेचन आहे. या ग्रंथात अध्यात्म, भक्ती आणि तत्त्वज्ञानाचा संगम साधला आहे, जे मानवी जीवनाचा एक सुंदर मार्ग दाखवते.

**ज्ञानेश्वरीतील प्रमुख तत्त्वज्ञान**

**ब्रह्मांड तत्त्वज्ञान**: सर्व विश्वाचे मूळ कारण ईश्वर आहे, असे ज्ञानेश्वरी मांडते. हे विश्व त्या ईश्वरापासून निर्माण होते आणि त्यालाच अधीन असते, असे प्रतिपादन केले आहे.

**आत्मविचार**: आत्म्याच्या अमरत्वावर आणि त्याच्या अस्तित्वावर भर दिला आहे. आत्म्यालाच अंतिम सत्य मानले जाते.

**भक्तीयोग**: ईश्वराप्रती असलेली निस्सीम भक्ती आणि शरणागती हे मुक्तीचे मार्ग आहेत, असे सांगितले आहे.

**कर्मयोग**: कर्म करणे महत्त्वाचे आहे, परंतु कर्माच्या फळाची अपेक्षा न ठेवता ते निष्काम भावनेने केले पाहिजे, यावर जोर दिला आहे.

**ज्ञानयोग:** ज्ञानाचे महत्त्व आणि ते मिळवण्याचे मार्ग यावर विचार मांडले आहेत. आत्मज्ञान आणि ब्रह्मज्ञान हे अंतिम ध्येय आहे, असे स्पष्ट केले आहे.

**मोक्ष आणि सायुज्य**: ज्ञानेश्वरीमध्ये मोक्ष किंवा सायुज्याचा मार्ग सोप्या आणि सुलभ भाषेत सांगितला आहे, जो सर्वसामान्यांना समजण्यासारखा आहे.

ज्ञानेश्वरी हा केवळ एक ग्रंथ नसून, तो तत्त्वज्ञानाचा एक उत्कृष्ट आणि सखोल अभ्यास आहे. यात केवळ तात्त्विक विचारच नाहीत, तर जीवन जगण्याचा एक सुंदर आणि व्यावहारिक मार्गही दिसतो.

**अमृतानुभव**

अमृतानुभव हा संत ज्ञानेश्वर महाराजांनी १३व्या शतकात लिहिलेला एक अत्यंत महत्त्वाचा मराठी ग्रंथ आहे. हे त्यांच्या स्वतंत्र रचनांपैकी एक असून, मराठी साहित्यातील एक मैलाचा दगड मानला जातो. याचे मूळ नाव 'अनुभवामृत' असून ऐतिहासिक हस्तलिखितांत तसे आढळते, तरी 'अमृतानुभव' हे नाव प्रचलित आहे. अमृतानुभव ग्रंथात संत ज्ञानेश्वरांनी मुख्यत्वे अद्वैत वेदांताची तात्त्विक चर्चा केली आहे. या ग्रंथातील प्रमुख तत्त्वे आणि विषय खालीलप्रमाणे आहेत. या ग्रंथात अद्वैत, आत्मज्ञान, जीवन-मरण यांच्या संकल्पना व तत्वज्ञान सोप्या मराठी भाषेत उलगडल्या आहेत.या ग्रंथाला नाथ आणि वारकरी परंपरेत महत्त्वाचे स्थान आहे.

**प्रमुख तत्त्वे**

**शिव-शक्ती अद्वैत**: शिव (निराकार, निर्गुण, निष्क्रिय) आणि शक्ती (सगुण, गतिमान, क्रियाशील) हे परस्परावलंबी असून एकच तत्त्व विविध रूपांनी प्रकट होते.

**आत्मज्ञान**: आत्मा हा सर्वत्र व्यापलेला, स्वतःच्या अनुभूतीने जाणणारा आणि शब्दातीत आहे.

**अद्वैत (अभेद)**: विश्वातील सर्व भेद निराळे असले तरी, त्या भेदांच्या पलीकडे

एकत्वाचा अनुभव ज्ञानेश्वर मांडतात.

बोध आणि अविद्या: आत्मज्ञानामुळे अविद्या (अज्ञान) नष्ट होते. या प्रक्रियेत 'नेति-नेति' (हेही नाही, तेही नाही) असा निवाडाही येतो.

**ग्रंथातील विषय**

१. आत्मतत्त्व आणि त्याचे स्वरूप

२. विश्व आणि विश्वातील भेदाभेद, मायादर्शन

३. शिव-शक्तीचे तत्त्वज्ञान आणि त्यांचा एकत्ववाद

४. वाचा/शब्द आणि त्यापलीकडील अनुभूती (शब्दब्रह्म विरहित अनुभव)

५. जीव, ब्रह्म, माया यांच्या संबंधाचे विवेचन

६. आत्मानुभूती, मोक्ष आणि मुक्तावस्था

७. करणी आणि अकर्मता (कर्तेपणा व निर्लेपता)

अमृतानुभव एकूण दहा प्रकरणांत आणि अंदाजे ८०४ ओव्यांत रचला गेला असून, प्रत्येक प्रकरणात या तत्त्वांचा विस्तार केला आहे. यात आत्मज्ञान, अद्वैत, शिव-शक्ती, अविद्या-विद्या, मोक्ष, आत्मस्वरूप इत्यादी विषयांची साधी, पण खोल मांडणी आहे.

## सिद्धांत-सूत्रपाठ

महानुभाव पंथातील ‘सिद्धांत-सूत्रपाठ’ हा एक स्वतंत्र, अत्यंत महत्त्वाचा तत्त्वग्रंथ आहे. तो महानुभाव पंथाचे मूळ तत्त्वज्ञान मांडणारा आधारग्रंथ आहे. हा ग्रंथ श्रीचक्रधर स्वामी यांनी दिलेल्या संक्षिप्त उपदेश-वचने (सूत्रे) यांचे संकलन आहे; ही वचने नंतर केशिराजबास (केशवराज सूरी) व इतर आचार्यांनी वर्गीकरण करून ग्रंथरूपात मांडली. महानुभाव पंथात याला “महानुभावांचे वेद”, “शास्त्ररूप परमेश्वर” असेही म्हटले जाते आणि हा त्यांच्या दैनंदिन नित्यपठणात व पारायणात वापरला जातो.

रचना आणि मांडणी

सूत्रपाठात साधारणपणे १२५५ सूत्रे असून ती सोळा/अकरा प्रकरणांत विभागलेली आढळतात; पूर्वी, पंचकृष्ण, पंचनाम, अन्यव्यावृत्ती, युगधर्म, विद्यामार्ग, संहार, संसरण, महावाक्य, निर्वचन, आचार, आचारमालिका,

विचार, विचारमालिका अशी प्रकरणांची नावे दिली जातात.

अल्प शब्दांत गहन आशय मांडणे, संकेतात्मक शैली, आणि पंथाचे तत्त्वज्ञान थेट साधकाला उपदेशाच्या रूपात देणे ही या ग्रंथाची प्रमुख वैशिष्ट्ये मानली जातात.

**तत्त्वज्ञानातील स्थान आणि उपयोग**

महानुभाव पंथातील पुढील सर्व तत्त्वग्रंथ, पक्ष, लापिका, भाष्ये इत्यादींसाठी सूत्रपाठ हा आधार किंवा मूळ मानला जातो; म्हणजे जसा रामदासी परंपरेत दासबोध तसा महानुभावांमध्ये सूत्रपाठ असा उल्लेख केला जातो.

आजही पंथीय संन्यासी व साधक याचे पारायण, कंठस्थ अभ्यास आणि प्रवचनांमध्ये संदर्भ करतात, त्यामुळे हा ग्रंथ जिवंत परंपरेत कार्यरत आहे.

**दासबोध**

दासबोध हा संत समर्थ रामदास स्वामी यांनी मराठीत रचलेला अत्यंत महत्त्वाचा आध्यात्मिक व व्यावहारिक ग्रंथ आहे. हा रामदास संप्रदायाचा मुख्य आधारग्रंथ मानला जातो.

**रचना आणि स्वरूप**

दासबोध संवादरूप आहे – गुरु (समर्थ) आणि शिष्य (कल्याणस्वामी) यांचा संवाद या रूपात मांडलेला आहे.

ग्रंथ २० “दशक” (भाग) आणि प्रत्येक दशकात १० “समास” अशा एकूण २०० समासांमध्ये विभागलेला आहे.

**मुख्य विषय**

भक्ती, ज्ञान, वैराग्य, विवेक, साधना, आत्मस्वरूप, मोक्ष हे आध्यात्मिक विषय.

प्रपंच, व्यवहार, राजकारण, संघटन, नीतिशास्त्र, व्यक्तिमत्त्व विकास, समाजधर्म अशा लौकिक गोष्टींचेही मार्गदर्शन.

**उद्देश आणि वैशिष्ट्य**

सामान्य गृहस्थ, राजकारणी, साधू, विरक्त, तरुण–वृद्ध अशा सर्वांना चालेल असे सोपे, थेट आणि व्यवहार्य उपदेश देणे हा दासबोध या ग्रंथाचा मुख्य

उद्देश आहे.

दासबोध या ग्रंथ अत्यंत साधी, मार्मिक भाषा; उदाहरणे, दृष्टांत, युक्तिवाद वापरून "आध्यात्म + व्यवहार" यांचे एकत्रित शिक्षण देतो.

## मराठी व्याकरण ग्रंथ

मध्ययुगात महानुभाव वैय्याकरणी ग्रंथकार 'व्याकर्ण'(म्हाइंभट), 'सुभाषनिबंधु'(भानुभट बोरीकर), 'भाषा मंजरी'(केसोबास), 'लिंगत्रय विवंचना'(दामोदर पंडित), 'लक्षण रत्नाकर'(गोपाळ पंडित), 'महाराष्ट्र भाषाभाष्य'(सुभाष्य), 'पंचवार्तिक', 'नामविभक्ती', 'द्वात्रिंशलक्ष्णरत्नाकर', 'व्याकरण' इत्यादी मराठी व्याकरण ग्रंथ रचले गेले. मराठीत तेराव्या शतकापासून व्याकरणे लिहायची सुरू असलेली प्रथा पुढे खंडित झाली. मराठीतील प्राचीन व्याकरण ग्रंथांमध्ये महानुभाव पंथातील भीष्माचार्य यांचे 'पंचवार्तिक' आणि भास्करभट्ट बोरीकर (कवीश्वर व्यास) यांचे 'सुभाषनिबंधु' हे महत्त्वाचे आहेत. प्रमाण मराठीचे आद्य व्याकरण म्हणून स्कॉटिश मिशनरी असलेल्या विल्यम केरीच्या 'ग्रामर ऑफ मराठा लँग्वेज'(A GRAMMAR OF THE MAHARATTA LANGUAGE) या व्याकरणग्रंथाचा निर्देश करता येईल.या ग्रंथात अक्षररचना ते वाक्यरचना अशा विविध व्याकरणग्रंथांची माहिती, देवनागरी आणि मोडी लिपींचा परिचय देण्यात आलेला होता. अव्वल इंग्रजी कालखंडात दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी संस्कृत व इंग्रजी भाषांच्या व्याकरणाचे अध्ययन करून आणि मराठी भाषेच्या रूपविचाराची स्वतंत्र प्रज्ञेने व्यवस्था लावून 'महाराष्ट्र भाषेचे व्याकरण'(१८३६) सिद्ध करून मराठी व्याकरणविषयक अग्रेसर व महत्त्वाचे कार्य केले असून त्यायोगे मराठी गद्याला प्रमाणरूप प्राप्त झाले असल्याने 'मराठी भाषेचे पाणिनी' हे बिरुद दादोबा पांडुरंगांना लावले जाते. दादोबा यांच्यानंतर मराठी

व्याकरणाची व्यापक आणि विस्तृत मांडणी मोरो केशव दामले यांनी ‘शास्त्रीय मराठी व्याकरण’ या व्याकरण ग्रंथाद्वारे केली.

## मराठी वैद्यक ग्रंथ

मध्ययुगात इसवीसनाच्या चौदाव्या शतकात विठ्ठल गलंड यांनी ‘रसकौमुदी’, ‘हितोपदेश’, ‘वैद्यचकोरचंद्रिका’, रसरत्नदीप’ इ. चार आयुर्वेदीय वैद्यक ग्रंथ मराठीत लिहिले आहेत, तर ‘वैद्यवल्लभ संहिता’, ‘रससिंधू’, ‘रसराजलक्ष्मी’ हे तीन ग्रंथ संस्कृतमध्ये लिहिले आहेत. विठ्ठल गलंड हे एक महाराष्ट्रीय वैद्य आणि मराठी वैद्यकीय ग्रंथांचे लेखक होते. त्यांनी संस्कृत व मराठी दोन्ही भाषांमध्ये लेखन केले आहे.मराठीत वैद्यक ग्रंथ लिहिणारा पहिला व्यक्ति म्हणजे ‘विठ्ठल गलंड’ होय. ते मूळचे विदर्भाचे असावेत असे मानले जाते. विदर्भातून आलेले, विठ्ठल गलंड यांनी आपल्या ज्ञानाने आणि विद्येने विजयनगर साम्राज्याचे राजा बुक्कराय यांना प्रभावित केले आणि ते बुक्काचे राजवैद्य बनले असावेत.

**रसकौमुदी**

रसकौमुदी हा मराठीतील पहिला वैद्यकीय ग्रंथ असून तो उस्मानिया विद्यापीठातील मराठी विभागाचे माजी प्राध्यापक आणि विभागप्रमुख डॉ. श्रीधर रंगनाथ कुलकर्णी यांनी प्रकाशित केला आहे. या ग्रंथात रसशोधन (पाऱ्याचे शुद्धीकरण), रसापासून बनवलेल्या २७ औषधांच्या औषधशास्त्रीय प्रक्रिया आणि त्यांचे उपचार, विषांवरील उतारा, निरोगी माणसाची लक्षणे, आजारपण, 'रसा'पासून बनवलेली औषधे कशी द्यावीत? इत्यादी विषयांचा समावेश आहे. हा ग्रंथ ओवी छंदात रचलेला आहे.

**वैद्यचकोरचंद्रिका**

वैद्यचकोरचंद्रिका हा ग्रंथ लेखकाचे महान आयुर्वेदिक ज्ञान दर्शवतो. या ग्रंथात नाडीज्ञानाचा विषय दिला आहे, जो जुन्या संहितांमध्ये आढळत नाही.

**हितोपदेश**

हितोपदेश हा इतर औषधनिर्मितीसोबतच पारदयुक्त औषधनिर्मितीला अधिक समर्पित आहे आणि तो उपचारविषयक ज्ञानाचा सार म्हणून रचलेला आहे.

**रसरत्नदीप**

रसरत्नदीप हा ग्रंथ मराठी गद्य आणि पद्य स्वरूपात आहे आणि यात स्पष्टपणे पारदयुक्त औषधनिर्मितीचा विषय हाताळलेला आहे.

**वैद्यवल्लभसंहिता**

वैद्यवल्लभसंहिता हा संस्कृत ग्रंथ अभिजात ग्रंथांच्या शैलीत लिहिला आहे म्हणजेच ग्रंथाचे सूत्रस्थान, निदानस्थान, उत्तरस्थान इत्यादी स्थानांमध्ये (विभागांमध्ये) विभाजन करून लेखन केले आहे.

वैद्यवल्लभसंहिता या ग्रंथात रसांची अनेक औषधे दिलेली नाहीत, तर फक्त चूर्ण, काढे, तूप आणि तेल आणि इतर अशाच प्रकारची औषधे दिली आहेत. पारा आणि इतर धातू इत्यादी असलेले अनेक सुप्रसिद्ध औषधोपचार, जे सामान्यतः उत्तर मध्ययुगीन काळातील सर्व ग्रंथांमध्ये आढळतात, ते या ग्रंथात आढळत नाहीत. या ग्रंथावरकिमयाशास्त्र किंवा रस आणि सिद्ध यांच्या ग्रंथांपेक्षा जुन्या अभिजात ग्रंथांचा अधिक प्रभाव दिसतो.

**रससिंधू**

रससिंधूमध्ये पाच अध्याय आणि सुमारे पाचशे श्लोक आहेत. यात पारा आणि इतर धातू तसेच औषधी वनस्पती आणि औषधे यांच्या निर्मितीची प्रक्रिया, निदान, पाच शुद्धीकरण पद्धती आणि अशा इतर विषयांवर विद्वत्तापूर्ण आणि स्पष्ट शैलीत, विविध प्रकारच्या श्लोकांमध्ये चर्चा केली आहे, जे लेखकाचे साहित्यिक आणि काव्य कौशल्य दर्शवतात. लेखकाने या ग्रंथाच्या सुरुवातीलाच या ग्रंथाच्या महत्त्वाचा उल्लेख केला आहे. त्याने सिद्ध आणि वैद्यकशास्त्रातील प्रसिद्ध विद्वानांच्या मतांचा उल्लेख केला आहे. त्याने सुमारे ४० ते ५० ग्रंथांचा अभ्यास केला होता आणि हा ग्रंथ वैद्यकशास्त्राचा महासागर होता. या ग्रंथाला ‘वैद्यकसाररससिंधू’ असेही म्हणतात.

**रसराजलक्ष्मी**

रसावरील विविध ग्रंथांचा सखोल अभ्यास करून 'रसराजलक्ष्मी' हा ग्रंथ

लिहिला. ग्रंथाची सुरुवात एका चांगल्या वैद्याच्या वर्णनाने होते. हा ग्रंथ विविध प्रकारच्या श्लोकांमध्ये उपमा आणि इतर अलंकारांचा वापर करून मनोरंजक शैलीत लिहिलेला आहे.रसराजलक्ष्मीवर काही टीकाग्रंथ आहेत. मराठी पद्यरूपातील एक टीकाग्रंथ स्वतः लेखक विठ्ठल गलंड याचाच आहे.

## महाराष्ट्रीय ज्ञानप्रणाली आणि गणित- खगोलशास्त्र

भास्कराचार्य द्वितीय हे इसवीसनाच्या बाराव्या शतकातील एक महान भारतीय गणितज्ज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ असून ते महाराष्ट्रीय होते. भास्कराचार्य यांनी 'सिद्धान्तशिरोमणि' (ज्यात अंकगणित, बीजगणित, खगोलशास्त्र आणि गोलाध्याय समाविष्ट आहेत) आणि 'लीलावती' यांसारख्या महत्त्वपूर्ण ग्रंथांची रचना केली असून, त्यात कलन (calculus) आणि अंक प्रणालीतील त्यांचे योगदान दिसून येते. त्यांनी ग्रह-ताऱ्यांच्या गतीचा अचूक अभ्यास करून खगोलशास्त्राला नवी दिशा दिली. त्यांनी संस्कृतमध्ये लीलावती, बीजगणित हे गणिती ग्रंथ, तर ग्रहगणिताध्याय, गोलाध्याय, करणकुतूहल हे खगोलशास्त्रीय ग्रंथ लिहिले आहेत. ‘सिद्धान्तशिरोमणि’ हा ग्रंथ त्यांच्यानंतर सुमारे ७०० वर्षे ज्योतिषगणितावरील प्रमाणभूत ग्रंथ मानला गेला. सिद्धान्तशिरोमणि या ग्रंथाचे लीलावती (पाटीगणित), बीजगणित, ग्रहगणिताध्याय व गोलाध्याय हे चार खंड असून लीलावती व बीजगणित हे पहिले दोन स्वतंत्र ग्रंथांसारखेच मानण्यात येतात. अंकगणिताचे पाठ्यपुस्तक म्हणून ‘लीलावती’या ग्रंथाचा भारतात अनेक शतके उपयोग करण्यात येत होता.

## समारोप

थोडक्यात महाराष्ट्रीय ज्ञान प्रणाली ही एक भारतीय ज्ञान प्रणालीचा भाग आहे, ज्यामध्ये हजारो वर्षांपासून विकसित झालेल्या ज्ञानाचा समावेश आहे, ज्यात विज्ञान, तत्वज्ञान, व्याकरण, कला, साहित्य, आयुर्वेद आणि गणित यांसारख्या क्षेत्रांचा समावेश असून त्याचा आविष्कार प्रामुख्याने मराठी भाषेत झालेला आहे. महाराष्ट्रीय ज्ञान प्रणालीने केवळ महाराष्ट्रीय, भारतीय समाजावरच नव्हे, तर जागतिक विचारांवरही लक्षणीय प्रभाव टाकला आहे.

# महाराष्ट्रातील मध्ययुगीन ज्ञान संकल्पना आणि लोकवाङ्मय

महाराष्ट्रातील मध्ययुगीन कालखंड (प्रामुख्याने १३ वे ते १८ वे शतक) हा सांस्कृतिक, धार्मिक आणि वाङ्मयीन दृष्टीने अत्यंत समृद्ध मानला जातो. या काळातील 'ज्ञान संकल्पना' ही केवळ ग्रंथांपुरती मर्यादित नसून ती सामान्यांच्या अनुभूतीशी जोडलेली होती, तर 'लोकवाङ्मय' हे या संस्कृतीचे आणि लोकजीवनाचे जिवंत प्रतिबिंब होते.

## १. मध्ययुगीन महाराष्ट्रातील ज्ञान संकल्पना

मध्ययुगीन कालखंडात 'ज्ञान' या संकल्पनेकडे पाहण्याचा दृष्टिकोन आधुनिक काळापेक्षा वेगळा होता. या काळात ज्ञानाचा मुख्य उद्देश भौतिक प्रगतीपेक्षा आत्मोन्नती, मुक्ती आणि सामाजिक समता हा होता.

**अ) पारमार्थिक ज्ञान विरूद्ध व्यावहारिक ज्ञान**

**पारमार्थिक ज्ञान (अध्यात्म)**: मध्ययुगीन विचारात 'ब्रह्मज्ञान' किंवा 'आत्मज्ञान' हेच सर्वोच्च ज्ञान मानले गेले. स्वतःची ओळख पटणे आणि ईश्वराशी एकरूप होणे म्हणजेच खरे ज्ञान, अशी धारणा होती.

**व्यावहारिक ज्ञान**: शेती, व्यापार, युद्धकला आणि प्रशासन यांशी संबंधित ज्ञानही समाजात अस्तित्वात होते, परंतु साहित्यात पारमार्थिक ज्ञानाला अधिक प्रतिष्ठा होती.

**ब) ज्ञानाचे लोकशाहीकरण (भक्ती चळवळ)**

मध्ययुगापूर्वी ज्ञान आणि संस्कृत भाषा यावर ठराविक उच्चवर्गीयांची मक्तेदारी होती. संत ज्ञानेश्वरांपासून सुरू झालेल्या भक्ती चळवळीने ही मक्तेदारी मोडून काढली.

**प्राकृत/मराठी भाषेचा स्वीकार**: **"माझा मऱ्हाटाचि बोलु कौतुकें..."** असे म्हणत संतांनी संस्कृतमधील कठीण ज्ञान मराठी भाषेत (प्राकृतात) आणले. यालाच 'ज्ञानाचे लोकशाहीकरण' म्हणतात.

अनुभवजन्य ज्ञान: संतांनी केवळ पोथीनिष्ठ (पुस्तकी) ज्ञानाला महत्त्व न देता 'अनुभवाच्या' ज्ञानाला श्रेष्ठ मानले. चोखामेळा, सावता माळी, गोरा कुंभार यांनी आपापले व्यवसाय करतअसतानाच अंतःकरणातून ज्ञान मिळवले.

**क) ज्ञान, भक्ती आणि कर्माचा समन्वय**

मध्ययुगीन ज्ञान संकल्पनेत कोरड्या बुद्धीवादाला स्थान नव्हते. ज्ञानात करुणा, सदाचार आणि भक्ती असणे अनिवार्य मानले गेले. संत एकनाथ आणि संत तुकाराम यांच्या साहित्यातून हा समन्वय स्पष्टपणे दिसतो. 'ज्ञान' म्हणजे केवळ माहिती नव्हे, तर ती आचरणात आणण्याची वृत्ती होय.

## २. मध्ययुगीन लोकवाङ्मय

लोकवाङ्मय म्हणजे परंपरेने मुखोद्गत (तोंडी) चालत आलेले, ज्याचा कोणताही एक निश्चित लेखक नसतो, तर संपूर्ण समाज हीच त्याची निर्मिती असतो. मध्ययुगीन महाराष्ट्रात लोकवाङ्मयाने जनमानसाचे मनोरंजन तर केलेच, पण नैतिक शिक्षणही दिले.

लोकवाङ्मयाचे प्रामुख्याने दोन प्रकारांत वर्गीकरण करता येते: लिखित परंपरेतील लोकवाङ्मय आणि मौखिक (तोंडी) परंपरेतील लोकवाङ्मय.

**अ) मौखिक परंपरेतील लोकवाङ्मय**

| प्रकार | वैशिष्ट्ये आणि स्वरूप |
|---|---|
| **जात्यावरील ओव्या** | घरातील स्त्रिया पहाटे दळण दळताना या ओव्या गात असत. यात माहेरची ओढ, सासरचे कष्ट, पती-मुलांविषयीचे प्रेम आणि विठ्ठल-रखुमाईसारख्या देवतांचे संदर्भ असत. हे स्त्रियांच्या भावनांचे प्रकटीकरण होते. |
| **पाळणे व अंगाईगीते** | बालकांना झोपवण्यासाठी किंवा त्यांच्या जन्माचा आनंद साजरा करण्यासाठी गायली जाणारी वात्सल्यपूर्ण गीते. |
| **लग्नगीते व सणांची गाणी** | हळद, डोहाळे जेवण, किंवा नागपंचमी, गौरी-गणपती यांसारख्या सणांच्या वेळी गायली जाणारी सामूहिक गाणी. यातून मध्ययुगीन कौटुंबिक जीवनाचे दर्शन घडते. |

**ब)शाहिरी आणि लोककला वाङ्मय (उत्तर मध्ययुग - शिवकाळ व पेशवाई)**

१७ व्या आणि १८ व्या शतकात लोकवाङ्मयाला एक व्यावसायिक आणि सादरीकरणाचे स्वरूप आले. यात खालील प्रकार मुख्य आहेत:

**पोवाडा (वीररस)**:

**स्वरूप**: पोवाडा हा प्रामुख्याने शौर्य आणि पराक्रमाचे वर्णन करणारा काव्यप्रकार आहे.

**महत्त्व**: छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात अफझलखान वधाचा पोवाडा (अज्ञानदासकृत) अत्यंत प्रसिद्ध आहे. पोवाड्यांनी समाजात वीरश्री निर्माण करण्याचे आणि इतिहास जिवंत ठेवण्याचे काम केले.

**लावणी (शृंगाररस)**:

**स्वरूप**: पेशवाईच्या काळात लावणीला मोठी प्रतिष्ठा मिळाली. यात मानवी भावना, शृंगार, आणि कधीकधी विरह यांचे सुंदर वर्णन असते. राम जोशी, प्रभाकर, होनाजी बाळा हे या काळातील प्रमुख शाहिर होते.

**भारुड आणि गवळण**:

**स्वरूप**: संत एकनाथांनी लोककलांचा (डोंबारी, वाघ्या-मुळी, कोल्हाटी) वापर करून 'भारुडे' रचली. वरून विनोदी किंवा सांसारिक वाटणाऱ्या या भारुडांच्या अंतर्भागात आध्यात्मिक ज्ञान दडलेले असे.

**गवळण**: कृष्ण आणि गोपींच्या संवादातून भक्तीचा संदेश देणारा हा प्रकार लोकमानसात खूप प्रिय होता.

**गोंधळ आणि जागरण**:

देवीच्या उपासनेसाठी 'गोंधळ' आणि खंडोबाच्या भक्तीसाठी 'जागरण' घातले जाई. हे धार्मिक विधी असले तरी त्यातून लोकनाट्य आणि लोकसंगीताची मोठी परंपरा निर्माण झाली.

## ३. ज्ञान संकल्पना आणि लोकवाङ्मय यांमधील परस्परसंबंध

मध्ययुगीन काळात उच्चविद्याविभूषितांचे ज्ञान आणि सामान्यांचे लोकवाङ्मय हे एकमेकांपासून वेगळे नव्हते.

**१. संतांनी लोकभाषेचा केला वापर**: संतांना वेद-उपनिषदांचे ज्ञान बहुजन समाजापर्यंत पोहोचवायचे होते. त्यासाठी त्यांनी ओवी, अभंग आणि भारुडांसारख्या लोकछंदांचाच आश्रय घेतला.

**२. मूल्यांची जपणूक**: लोकवाङ्मयाने (उदा. कथा, गाणी) संतांनी सांगितलेली नैतिक मूल्ये, पाप-पुण्याची जाणीव आणि मानवतावाद पिढ्यानपिढ्या जिवंत ठेवला.

## निष्कर्ष

थोडक्यात सांगायचे तर, मध्ययुगीन महाराष्ट्रातील ज्ञान संकल्पना ही 'अनुभूती आणि समतेवर' आधारित होती, तर लोकवाङ्मय हे त्या ज्ञानाला आणि लोकसंस्कृतीला वाहून नेणारी 'जीवनवाहिनी' ठरले. या दोन्ही घटकांनी मिळून महाराष्ट्राचा सांस्कृतिक पाया म्हणजेच 'मराठी टक्का' आणि 'वारकरी संस्कृती' घडवली.


भारतीय
ज्ञान प्रणाली


भारतीय ज्ञान परंपरा
अनादि, अनंत आणि अमूल्य वारसा
॥ सा विद्या या विमुक्तये ॥
जी विद्या मुक्त करते, तीच खरी विद्या होय.
ऋग्वेद
यजुर्वेद
सामवेद
अथर्ववेद
वेद आणि उपनिषदे
प्रकृती, ब्रह्मांड आणि जीवनांचे गूढ ज्ञान देणारे आद्य ग्रंथ.
योग आणि ध्यान
शरीर, मन आणि आत्म्याचा समतोल साधणारी वैज्ञानिक पद्धत.
विज्ञान आणि गणित
शून्य, दशमान पद्धती, आर्यभट्ट, भास्कराचार्यांचे अद्वितीय योगदान.
आयुर्वेद आणि आरोग्य
स्वस्थ जीवन आणि दीर्घायुष्यासाठी निसर्गाधारित विज्ञान आणि समग्र दृष्टिकोन.
कला, साहित्य आणि संस्कृती
साहित्य, संगीत, नृत्य, वास्तुशास्त्र आणि शिल्पकला यांतून प्रकटलेली समृद्ध भारतीय संस्कृती.
आपली मूल्ये
सत्य
धर्म
शांती
प्रेम आणि करुणा
सेवा
समन्वय
वसुधैव कुटुंबकम्
ॐ
महान विचार
॥ अहिंसा परमो धर्मः ॥
॥ वसुधैव कुटुंबकम् ॥
॥ एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति ॥
– ऋग्वेद
भारतीयांची वैश्विक देणगी
शून्य आणि दशमान पद्धती
आयुर्वेद आणि योग
धातुकर्म आणि वास्तुकला
जलव्यवस्थापन आणि शाश्वत जीवनशैली
न्याय, तर्कशास्त्र आणि व्याकरण
खगोलशास्त्र आणि कालगणना
साहित्य, नाट्य, संगीत आणि नृत्य
आजच्या काळात प्रेरणा
भारतीय ज्ञान परंपरा आपल्याला समतोल, शाश्वत आणि मूल्याधिष्ठित जीवन जगण्याची प्रेरणा देते.
आपला अभिमान, आपली ओळख, आपले भविष्य!
भारतीय ज्ञान परंपरा जपूया, समजून घेऊया आणि पुढे नेऊया.
ज्ञानातून प्रबोधन,
प्रबोधनातून आत्मोन्नती,
आणि आत्मोन्नतीतून
विश्वकल्याण.

# लेखक परिचय



**प्रा. समीर रामचंद्र वैरागी**

| | | |
|---|---|---|
| नाव | : | प्रा. समीर रामचंद्र वैरागी |
| व्यवसाय | : | सहायक प्राध्यापक आणि विभागप्रमुख (मराठी), राजपत्रित अधिकारी (म.शि.से.), गट –अ, महाराष्ट्र शासनाचे इस्माईल युसुफ महाविद्यालय, जोगेश्वरी(पूर्व), मुंबई – ६०. |
| शिक्षण | : | एम.ए., बी.एड., एम.फिल., नेट (जेआरएफ), सेट, |
| इतर शैक्षणिक अर्हता | : | वृत्तपत्रपदविका, भगवद्गीता पदविका, मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम, भारतीय ज्ञान परंपरा प्रमाणपत्र अभ्यासक्रम |